# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## शुक्रवार, दिनांक २३ डिसेंबर, २०२२

## (सकाळी १०-३० ते ११-४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(मंगळवार, दिनांक २० डिसेंबर, २०२२, बुधवार दिनांक २१ डिसेंबर, २०२२ व गुरुवार दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (१)] —**

(१) **श्री. अंबादास दानवे,** डॉ. मनिषा कायंदे, ॲड. अनिल परब, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात दिवाळी सणानिमित्त शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाने महाराष्ट्र दिवाळी निमित्त फूड किट (चना डाळ, रवा, साखर व पामतेल) पुरवठा करण्याबाबत राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीपूर्वीच ५१३ कोटी २४ लाख रुपयांची निविदा NCDEX Emarkets limited या कंपनीला देण्यात आलेली असणे, दिनांक १ ऑक्टोबर, २०२२ रोजी कंपनीकडून परिपत्रक प्रसिध्द झाले असून शासनाच्या निकषाप्रमाणे निविदाप्रक्रिया न करता संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी मनमानी पध्दतीने संबंधित कंपनीला कंत्राट देण्यात आलेले असणे, सदर योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता काढण्यात आलेले टेंडर, नेमलेले ठेकेदार ही सर्व कारवाई करत असताना, शासन नियमाप्रमाणे कोणतेही नियम व निकष यांचे पालन करण्यात न आल्याची गंभीर बाब उघडकीस येणे, पुणे, मुंबई, औरंगाबाद तसेच राज्यातील अन्य जिल्हयात दिवाळी सणाच्या आधी रेशनकार्ड धारकांना आनंदाचा शिधा मिळाला नसल्याच्या आलेल्या लाखो तक्रारी, जाहिर केलेले पाच जिन्नस एकाच पिशवीतून एकाच वेळी मिळाल्याच्या घटना संपूर्ण राज्यात कोठेही न घडणे, शासनाने शिधापत्रिका धारकांना हा आनंदाचा शिधा देत असताना औरंगाबाद, नाशिक, नगर इ.अनेक जिल्हयात बायोमेट्रिक यंत्रणा बंद असल्याने सदर शिधा रेशनधारकांपर्यंत पोहोचविण्यात रेशन दुकानदारांना आलेले अपयश, राज्यातील लाभार्थ्यांना दिवाळी सणानिमित्त स्वस्तात अन्न धान्य मिळावे यासाठी १०० रुपये अशी आनंदाचा शिधाची किंमत शासनाने निश्चित करण्यात आलेली असताना ही आदिवासी भागातील शहापूर तालुक्यात ३०० रुपयात विक्री होत असल्याची घटना निदर्शनास येणे, राज्यात पैठण व इतर भागात शिधावाटपाच्या पिशवीवर राजकीय नेत्यांचे फोटो छापण्यास उशीर झाल्यामुळे दिवाळी सणाच्या दिवशीही आनंदाचा शिधा त्यांच्यापर्यंत पोहोचलेला

अग्रिम प्रत

नसल्याच्या घटना निदर्शनास येणे, सामान्य जनतेची दिवाळी गोड करण्याच्या उद्देशाने निविदा काढण्यात दाखवलेली तत्परता, सर्वसामान्य लाभार्थ्यांना आनंदशिधा मिळण्यासाठी न दाखविल्यामुळे जनतेमध्ये शासनाप्रती असंतोषाची भावना निर्माण झालेली असणे, दिवाळी सणानिमित्त किती आनंदाचा शिधा वितरीत करण्यात आला तसेच सदर विक्रीतून झालेल्या उत्पन्नाच्या लेखाशिर्षाची माहिती लोकप्रतिनिधींनी संबंधित विभागास मागूनही देण्यात आलेली नसणे, सदर प्रकरणाची चौकशी करुन नियमांची पायमल्ली करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तसेच सर्व सामान्य नागरिकांची लूट करणाऱ्या दुकानदारांवर कारवाई करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(बुधवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२२ व गुरुवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (२) व (३) ] —**

**(२)** **श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र शासनाच्या सर्व शासकीय विभागातील सरळ सेवेची भरती प्रक्रिया सन २०१९ पासून आज अखेरपर्यंत घेण्यात आलेली नसणे, तथापि, त्यासंदर्भात सरळसेवा पदभरतीबाबतची एकही जाहिरात देण्यांत आलेली नसणे, शासनाने सदर परिक्षेकरिता दिनांक १७/१२/२०२१ पर्यंत वयोमर्यादा संपणाऱ्या उमेदवारांना परिक्षेस बसण्याची परवानगी देण्यात आलेली असणे, परंतु अद्यापपर्यंत सरळसेवा पदभरतीची जाहिरात आलेली नसल्याकारणाने उमेदवार विद्यार्थी परिक्षेस बसण्यास अपात्र होत असल्याचे निदर्शनास येणे, वास्तविकत: महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सन २०१९ पासून गेल्या ३ वर्षांच्या कालावधीमध्ये घेण्यात आलेल्या परिक्षांबाबत ज्या ३-४ जाहिराती प्रसिध्द करण्यात आल्या त्यामध्ये ३०ते ४० जागा दिव्यांगाच्या सर्व संवर्गामध्ये भरण्यात आल्या असल्याचे निदर्शनास आलेले असणे, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सर्वसाधारण उमेदवारांसाठी दिनांक १७/१२/२०२१ च्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत निर्णय घेऊन दिनांक १७/१२/२०२१ पर्यंत वय संपलेले उमेदवार यांना दिनांक ३१/१२/२०२२ पर्यंत संधी देण्यात यावी, असे परिपत्रक काढण्यांत आलेले असणे, परंतु शासनाने दिव्यांग उमेदवारांच्या बाबतीत वेगळा निर्णय घेतला असल्याचे निदर्शनास येणे, परिणामी, शासनाने दिनांक १७/१२/२०२१ च्या परिपत्रकामध्ये शुध्दीपत्रक काढून दिनांक ३१/१२/२०२२ पर्यंत विहित वयोमर्यादा संपणाऱ्या उमेदवारांना दिनांक ३१/१२/२०२३ पर्यंत अर्ज करण्याची अनुमती देण्यात यावी म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या भरतीमध्ये त्यांना संधी मिळेल व त्यांच्यावर अन्याय होणार नाही अशी सर्वसाधारण उमेदवारांनी शासनाकडे मागणी करण्यांत येणे, तथापि, अद्यापही

अग्रिम प्रत

शासन स्तरावर कार्यवाही न होणे, त्यामुळे त्याबाबत आंदोलन करण्याची या उमेदवारांवर आलेली पाळी, सदर मागणी प्रकरणी शासनाने कार्यवाही करुन सर्वसाधारण (खुल्या) वर्गातील उमेदवारांना न्याय देणे आवश्यक असणे व त्याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(३) **डॉ. मनिषा कायंदे,** सर्वश्री प्रसाद लाड, आमश्या पाडवी, नागोराव गाणार, रमेशदादा पाटील, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात समाजकल्याण विभागामार्फत ४४१ शासकिय वसतिगृहे असून त्यात जवळपास ५० हजारांहून अधिक गरीब व गरजू विदयार्थी शिक्षण घेत असणे, परंतु या वसतिगृहात विदयार्थ्यांना गैरसोयी, अस्वच्छता आणि असुविधेचा अनुभव येणे, तर काही ठिकाणी नोंदवहीत नोंद असून विदयार्थी गायब असणे, काही वसतिगृहात तर पिण्याचे पाणी तसेच ग्रंथालयाची सोय, मुलींच्या वसतिगृहात सीसीटीव्ही नसल्याचे समोर येणे, वसतिगृहात साधनसामुग्रीचा नियमित पुरवठा होऊनही काही ठिकाणी इन्व्हर्टर, गरम पाण्याची तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही, अश्या आणि अनेक सोयीसुविधांपासून विद्यार्थी वंचित असणे, सन २०२१ मध्ये ६४ कोटी रुपयांचा निधी राज्यातील सर्व शासकिय वसतिगृहाच्या सोयीसुविधांसाठी निधी देण्यात आला होता तर काही वसतिगृहाच्या दुरुस्तीकरिता साडेसात कोटीचा निधी देण्यात आलेला होता असे असतांनाही विदयार्थ्यांना सुविधांपासून वंचित ठेवण्यात येणे, अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत नसणे, संगणक कक्ष, भोजन कक्ष नसणे, इमारतीतील दारे, खिडक्याच्या काचा, स्नानगृह, स्वच्छतागृह यांची असलेली दुरवस्था, उक्त विभागातर्फे सुरु असलेल्या वसतिगृहात विदयार्थ्यांना अनेक अडचणीचा सामना करावा लागत आहे त्याचबरोबर गेल्या सहा महिन्यांपासून रखडलेला निर्वाह भत्ता ,शाळा महाविदयालये सुरु होऊनही साहित्य मिळालेले नसणे, परिणामी विदयार्थी आर्थिक संकटात सापडणे ,निर्वाह भत्ता आणि इतर सुविधा तात्काळ न दिल्यास विदयार्थ्यांनी आंदोलनाचा दिलेला इशारा, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून तातडीने करावयाची कार्यवाही, यास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

अप्रकाशित

**(गुरुवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (४) ते (६) ] —**

**(४)** **श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"करमाळा तालुक्यातील सिना नदीवर सिना-कोळेगाव प्रकल्पास १९९२ साली प्रशासकीय मान्यता मिळून १९९४ साली करमाळा तालुक्यातील पूर्व भागातील मिरगव्हाण, भालेवाडी, हिवरे,आवाटी,कोळगाव, निमगाव ह,गौंडरे या गावातील ७३२ शेतकऱ्यांच्या घरांचे व जमिनींचे भूसंपादन करण्यात येणे, धरणग्रस्तांसंबंधी अगोदर पुनर्वसन नंतर धरण हे धोरण असताना संबंधित धरणग्रस्तांना पर्यायी जमिनी अद्यापि न मिळणे, गेली २७ वर्षे हा प्रश्न प्रलंबित असणे, संबंधित गावातील धरणग्रस्तांच्या प्रश्नांवर २०१२ साली तत्कालीन पुनर्वसन मंत्री यांचे दालनात बैठक होऊन अन्यायकारक निकष लावल्याने धरणग्रस्तांना जमिनी मिळाल्या नसल्याचे निदर्शनास येणे, त्यानंतर तत्कालीन पुनवर्सन मंत्री महोदयांनी संबंधित शेतकऱ्यांना जमिनी देण्यासाठी दोन महिन्यात प्रस्ताव सादर करुन कार्यवाही करण्याचे आदेश देणे, परंतु अद्यापही संबंधित ७३२ शेतकऱ्यांना पर्यायी जमिनीचे वाटप झालेले नसणे, यामुळे सिना-कोळेगाव प्रकल्पामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष, याकडे प्रशासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत निर्णय घेऊन करमाळा तालुक्यातील सिना-कोळगाव धरणग्रस्तांना पर्यायी जमिनी मिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**(५)** **सर्वश्री अभिजित वंजारी, अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"टाकळी - डोल्हारी प्रकल्पांतर्गत मौजा उदापूर, ता.नेर, जि. यवतमाळ येथील गावकऱ्यांची दिशाभूल करुन, प्रकल्पग्रस्तांना विश्वासात न घेता, बनावट कागदपत्रे बनवून अवैध पध्दतीने ग्रामसभा घेऊन भांडवलदारांच्या हिताकरिता आर्थिक हेतू बोगस, अवैधपणे, बेकायदेशीरपणे राबविण्यात आलेल्या पुनर्वसन प्रक्रिया रद्द करण्याबाबतची मागणी स्थानिक नागरिकांनी शासनाकडे केलेली असणे, उक्त प्रकरणी तत्कालीन मंत्री महोदय, मदत व पुनर्वसन तसेच जलसंपदा व संबंधित विभागाचे प्रधान सचिव यांच्या उपस्थितीत बैठक होऊन ग्रामसभा वैध अथवा अवैध याबाबत जिल्हाधिकारी, यवतमाळ व मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यवतमाळ यांच्याकडून स्वयंस्पष्ट अहवाल मागविण्यात आलेला असणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यवतमाळ यांनी अहवाल शासनास सादर केला असून त्यात त्यांनी ग्रामसभा अवैध असल्याचे स्पष्ट म्हटलेले असणे, जिल्हाधिकारी, यवतमाळ

अग्रिम प्रत

यांनी सुध्दा याबाबतचा अहवाल शासनास सादर केलेला असणे, असे असताना महसूल व वन विभागाच्या दिनांक १९.१०.२०२२ च्या पत्राच्या अनुषंगाने उक्त विषयी जिल्हा नियोजन व विकास मंडळ यांचेकडून अभिप्राय प्राप्त करण्यासाठी निर्देश देणे व तातडीने दिनांक २०.१०.२०२२ रोजी जिल्हा नियोजनच्या बैठकीत सदर विषय मांडण्यात येणे, परंतू मागील महिन्यापासून बैठकीचे इतिवृत्त तयार केले नसल्याचे संबंधित विभागाकडून सांगण्यात येणे, त्यामुळे या प्रकरणात मोठा आर्थिक घोटाळा झाल्याचे स्थानिकांमध्ये होत असलेली चर्चा, पुनर्वसन व भुसंपादन कायदयानुसार जिल्हा नियोजन समिती ही घटनात्मक संस्था नसून ग्रामसभेलाच सर्व अधिकार असताना हेतुपुरस्परपणे कायदयाला न जुमानता जिल्हा नियोजन कडे हा विषय देणे गैर असल्याने याची सखोल चौकशी करण्याची नितांत आवश्यकता, तसेच अहवाल सादर करुनही दोषींवर कोणत्याही प्रकारची कारवाई होत नसल्याने स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र स्वरुपाचा असंतोष व संतापाचे वातावरण, टाकळी - डोल्हारी प्रकल्पांतर्गत मौजा उदापूर, ता.नेर, जि. यवतमाळ येथील गावकऱ्यांची दिशाभूल करुन, प्रकल्पग्रस्तांना विश्वासात न घेता, बनावट कागदपत्रे बनवून अवैध पध्दतीने राबविण्यात येत असलेली पुनर्वसन प्रक्रिया तातडीने रद्द करुन नविन पुनर्वसन प्रक्रिया राबविण्याबाबचे आदेश त्वरीत निर्गमित करण्याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व याबाबतची शासनाची भूमिका."

(६) **श्री. सचिन अहिर**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"दि. ८ ऑक्टोबर २०२२ रोजीच्या पहाटे ५ च्या सुमारास नाशिक ते औरंगाबाद मार्गावर मिरची हॉटेल जवळ चिंतामणी ट्रॅव्हल्सच्या एका खाजगी बसला झालेला मोठा अपघात, अपघातानंतर या बसमध्ये आग लागून १२ प्रवाशांचा झालेला होरपळून मृत्यू, या अपघातात जवळपास ३८ प्रवासी गंभीर जखमी होणे, तर काहींची प्रकृती चिंताजनक असणे, त्याच दरम्यान नाशिक येथील सप्तशृंगी गड ग्रामपंचायत टोल नाक्याच्या जवळ महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळच्या एस.टी.बसला शॉर्ट सर्कीटमुळे लागलेली आग, राज्यात वाढत असलेले वारंवार रस्ते अपघात याबाबत पोलिस यंत्रणा विशेषतः परिवहन विभाग गंभीर नसणे, वाहन चालक बेधडकपणे प्रवासी कोंबून प्रवाशांकडून वाढीव भाडे वसूल करणे याबाबत शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक** : **प्रश्नोत्तरे.**

**दोन** : **कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

**(१) उप मुख्यमंत्री** : "महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या कलम ६ (१) नुसार सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पाच्या संदर्भात जमा व खर्चाच्या अर्धवार्षिक आढाव्याचे निष्कर्ष दर्शविणारे विवरणपत्र" सभागृहासमोर ठेवतील.

**(२) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** :

**(क)** "मुंबई विद्यापीठ, यांचा सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ या वर्षांचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचा सन २०२१ या वर्षाचा तेवीसावा वार्षिक अहवाल व सन २०२०-२०२१ या वर्षाचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**(३) कामगार मंत्री** :

**१)** "महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे सन २००४-२००५ ते सन २०१३-२०१४ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**२)** "रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा अठरावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**३)** "रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचे सन २०१७-२०१८ ते २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**४)** "पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचे सन २०१९-२०२० व २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे सतरावा व अठरावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

अस्थायी प्रत

५) "नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचे सन २०१९-२०२० व २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे सोळावा व सतरावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

६) "औरंगाबाद जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा अठरावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

७) "नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा एकोणिसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

८) "अहमदनगर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

९) "कापड बाजार आणि दुकाने मंडळ यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा पन्नासावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

१०) "माल वाहतूक कामगार मंडळ बृहन्मुंबई यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा पन्नासावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

११) "दि रेल्वे गुड्स क्लिअरिंग ॲण्ड फॉरवर्डिंग एस्टाब्लिशमेंट लेबर बोर्ड यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा चव्वेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

१२) "दि खोका मेकिंग ॲण्ड टिंबर मार्केट लेबर बोर्ड, मुंबई यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल." सभागृहासमोर ठेवतील.

अमुद्रित प्रत

**१३)** "सातारा जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचे सन २०१४-२०१५ ते २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**१४)** "सांगली जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचे सन २०१५-२०१६ ते २०१९-२०२० या वर्षांचे अनुक्रमे बत्तीसावा, तेहतीसावा, चौतीसावा, पस्तीसावा, व छत्तीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**१५)** "इचलकरंजी माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ इचलकरंजी यांचे सन २०१९-२०२० व २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे सत्तावीसावा व अठ्ठावीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**१६)** "नाशिक जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ (लासलगांव) यांचे सन २०१९-२०२० ते २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे एकतीसावा व बत्तीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**१७)** "नाशिक माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नाशिक यांचे सन २०१९-२०२० ते २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे पस्तीसावा छत्तीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**१८)** "परभणी-हिंगोली जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, परभणी यांचे सन २००९-२०१० ते २०१६-२०१७ या वर्षांचे सहावा, सातवा, आठवा, नववा, दहावा, अकरावा, बारावा व तेरावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**१९)** "बीड जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, बीड यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा चोवीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**२०)** "नागपूर व वर्धा जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नागपूर यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा सत्तेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**२१)** "जालना जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, जालना यांचे सन २०१८-२०१९ ते २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे तीसावा, एकतीसावा व बत्तीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**२२)** "मुंबई भाजीपाला बाजार असंरक्षित कामगार मंडळ, मुंबई यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा छत्तीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**२३)** "महाराष्ट्र मच्छिमारी उद्योगातील मच्छिमार आणि इतर कामगार मंडळ यांचे सन २०१९-२०२० ते २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे सहावा व सातवा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**२४)** "पुणे माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळ यांचे सन २००५-२००६ ते २०१६-२०१७ या वर्षांचे अनुक्रमे सव्वीसावा, सत्तावीसावा, अठ्ठावीसावा, एकोणतीसावा, तीसावा, एकतीसावा, बत्तीसावा, तेहतीसावा, चौत्तीसावा, पस्तीसावा, छत्तीसावा व सदतीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

असुधारित प्रत

**२५)** "पिंपरी चिंचवड माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचे सन २०१८-२०१९ ते २०१९-२०२० या वर्षांचे सत्तावीसावा व अठ्ठावीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**२६)** "अहमदनगर माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, अहमदनगर यांचे सन २०१९-२०२० ते २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**२७)** "औरंगाबाद माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, औरंगाबाद यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा एकोणतीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**२८)** "जळगाव जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, जळगाव यांचा सन २०२० २०२१ या वर्षाचा अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**२९)** "धुळे व नंदुरबार जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, धुळे यांचे सन २०१७-२०१८ ते २०१९-२०२० या वर्षांचे अनुक्रमे एकोणतीसावा, तीसावा, एकतीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**३०)** "लातूर उस्मानाबाद जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचा सन २०२० २०२१ या वर्षाचा तीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**३१)** "क्लिअरींग ॲण्ड फॉरवर्डिंग असंरक्षित गोदी कामगार मंडळ यांचा सन २०२० २०२१ या वर्षाचा तीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

असुधारित प्रत

**३२)** "नांदेड माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नांदेड यांचा सन २०२० - २०२१ या वर्षाचा एकोणतीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(४) कृषि मंत्री** : **(क)** "डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा त्रेपन्नावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचे सन २०१५-२०१६ व सन २०१६-२०१७ या वर्षाचे वार्षिक लेखे व लेखा परिक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** "महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांचे सन २०१३-२०१४ ते सन २०१९-२०२० या वर्षांचे वार्षिक लेखे व लेखा परिक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(५) महिला व बालविकास मंत्री** : "महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांचा सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे अनुक्रमे सव्वीसावा व सत्तावीसावा अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास).**

**चार : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(मंगळवार, दिनांक २० डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (१) ] —**

(१) **सर्वश्री प्रवीण दटके,** चंद्रशेखर बावनकुळे, नागोराव गाणार, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"हाफकीनच्या कार्यप्रणालीमुळे रुग्णालयांना अडचणींचा सामना करावा लागत असणे, दैनंदिन सर्जिकल साहित्य मागणीनंतर पुरवठ्यामध्ये साधारण वर्षभराचा फरक वाढल्याने तुटवडा होऊन रुग्णसेवेत अडचणी येत असणे ,

अप्रकाशित

हाफकीनची खरेदी प्रणाली अत्यंत वेळ खाऊ असून संचालनालय येथे करण्यात येणारी मागणी ते डीएमई मार्फत पडताळणी होऊन प्रशासकीय मान्यतेसाठी पाठवणे, नंतर हाफकिन महामंडळाद्वारे निविदा प्रक्रिया राबवणे अशा किचकट प्रक्रियेमुळे प्रत्यक्ष पुरवठ्यात विलंब होत असणे, संस्था स्तरावर वस्तू व पुरवठा लेखाशीर्ष २९ मधून प्राप्त निधीतून ९०% निधी हाफकीन महामंडळाकडे वर्ग झाल्यानंतर ८० % साहित्य प्राप्त होणे अपेक्षित असताना उर्वरित १०% टक्के निधीतून औषधी तसेच सर्जिकल साहित्य प्राप्त होण्यास अडचणी येत असणे, रुग्णांची गैरसोय होत असल्यास निदर्शनास येत असणे, याबाबत लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदनाद्वारे तक्रार केलेली असणे, सदर मंडळाचे बळकटीकरण करणे, मनुष्यबळाची अडचण दूर करून ऑनलाइन प्रणाली गतिशील करणे, वस्तू पुरवठा अबाधित राहण्यासाठी अंदाजपत्रक रुग्णसंख्या व प्रत्यक्ष खाटाच्या संख्येवर ठरवणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाय योजना."

**(गुरुवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (२) ते (४) ] —**

(२) **प्रा. राम शिंदे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"कर्जत तालुक्यात (जि.अहमदनगर) अनेक अनधिकृत खडीक्रश्चर असून त्यामुळे शासनाच्या करोडो रुपयांच्या महसूलाची हानी होण्याबरोबरच पर्यावरणाचा -हास होत असणे, सदर प्रकरणी wild life protection act, १९७२ चेही उल्लंघन होत असल्यामुळे तहसिलदार, कर्जत यांनी चौकशी करुन जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना तालुक्यातील अनधिकृत खडीक्रश्चरबाबत व त्यांच्यावर लावलेल्या दंडाबाबतचा अहवाल दिलेला असणे, उक्त प्रकरणी तालुक्यामध्ये एकही अधिकृत खडीक्रश्चर नसताना महसूल अधिकारी यांच्याशी संगनमत करून रात्री अपरात्री मोठया प्रमाणावर अनधिकृत उत्खनन केले जात असल्याचे निदर्शनास येणे, कर्जत तालुक्यातील अनधिकृत खडीक्रश्चर प्रकरणाची मा. निवृत्त न्यायाधीश, उच्च न्यायालय यांच्या अध्यक्षतेखाली पर्यावरण अधिकारी व खनिजकर्म अधिकारी यांच्यासह त्रिसदस्यीय उच्च समितीमार्फत चौकशी करून दोषींवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३१.१०.२०२२ रोजी बंदरे व खनिकर्म मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे केली असणे, सदर मागणीनुसार चौकशी करून दोषींवर तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता, यावर शासनाची प्रतिक्रिया."

अप्रकाशित प्रत

**(३)** **सर्वश्री विक्रम काळे,** सतिश चव्हाण, नागोराव गाणार, प्रविण दरेकर, प्रसाद लाड, प्रवीण दटके, श्रीमती उमा खापरे, ॲड. निरंजन डावखरे, डॉ. सुधीर तांबे, सर्वश्री राजेश राठोड, अभिजित वंजारी, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील अशासकीय अनुदानित शाळेतील दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पुर्वी सेवेत आलेल्या परंतु, ती शाळा किंवा वर्गतुकडी विनाअनुदान, अंशत: अनुदान किंवा टप्पा अनुदानावर असणे व दि. १ नोव्हेंबर, २००५ नंतर ती शाळा किंवा वर्गतुकडी १००% अनुदानावर येणे, या शिक्षकांची जुन्या पेन्शन योजनेची खाती उघडणे, त्या खात्यावर जुन्या पेन्शन योजनेप्रमाणे वेतनातून जी.पी.एफ हप्त्याची रक्कम कपात होणे, यामधील सेवानिवृत्त झालेल्या काही शिक्षकांना जुन्या पेन्शन योजनेचा लाभ मिळणे, त्यानंतर काही शिक्षकांची तोंडी आदेशाने जी.पी.एफ कपात बंद करणे, परंतु जुन्या पेन्शनची खाती सुरु ठेवणे, दि. १ नोव्हेंबर, २००५ पासून नविन पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय शासनाने घेणे असे असतांना नियमानूसार दि. १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत आलेल्या शिक्षकांची शाळा किंवा वर्गतुकडी दि. १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी १००% अनुदानावर नाही म्हणून त्यांना जुनी पेन्शन योजना लागू न करणे, हे अन्यायकारक असणे, यासाठी शिक्षक लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी शासनाकडे पाठपूरावा करणे, शासनाने यासंबंधीची काढलेली दि. १० जुलै,२०२० ची अधिसूचना रद्द करणे, शासनाने यासाठी सम्म्यक अभ्यास समितीचे गठन करणे, त्याचा अहवाल शासनास प्राप्त होणे, परंतु तरीही आजपावेतो शासनाकडून सकारात्मक निर्णय न होणे, पेन्शन हा विषय शिक्षकांच्या जीवनाशी व कुटूंबाशी निगडीत असल्यामुळे शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(४)** **डॉ. मनिषा कायंदे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात आतापर्यत पार पडलेल्या टीईटी परिक्षेतील ८६ हजार ४११ उमेदवार शिक्षकपदी नियुक्ती होण्याच्या प्रतिक्षेत असल्याचे नुकतेच माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये उघडकीस येणे, राज्य शासनाने सन २०१७ मध्ये पवित्र पोर्टलद्वारे शिक्षकांची पदे भरतीची योजना आखली, त्यामध्ये ६ हजार पदांवर भरती केली व उर्वरीत पदांची भरती प्रक्रिया अद्यापही पूर्ण करण्यात आलेली नसणे, तसेच राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये शिक्षकांची ३१ हजार ४७२ पदे रिक्त असणे, त्यातच राज्य शासनाने कमी पटसंख्येच्या शाळा बंद करण्याचा घेतलेला निर्णय, राज्यात मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये सध्या १५ हजार २८४ शिक्षकांची आवश्यकता असणे, पालघर जिल्हयात सर्वाधिक १९१६, यवतमाळ १३०७, रायगडात १०५१, सातारा १०२३, कोल्हापूरात ९७२ शिक्षकांची पदे

अग्रिम प्रत

रिक्त असणे, मोठया प्रमाणात शिक्षक भरती रखडल्यामुळे विदयार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याबाबत होत असलेला परिणाम, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याप्रकरणी शासनाने तातडीने लक्ष घालून शिक्षकांची भरती प्रक्रिया करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(५) **ॲड. निरंजन डावखरे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"ठाणे शहरातील विविध भागांना जोडणारी रिंग मेट्रो प्रस्तावित असणे, सद्यस्थितीत अस्तित्वात असणाऱ्या मंजूर विकास आराखडा मधील एच. सी. एम. टी. आर. (HCMTR) म्हणजेच हाय कॅपॅसिटी मास ट्रान्झिट रेल (HIGH CAPACITY MASS TRANSIT RAIL) याची आखणी व नव्याने प्रस्तावित एम. आर. टी. एस. (MRTS) म्हणजेच मास रॅपिडट्रान्झिट सिस्टीम (MASS RAPID TRANSIT SYSTEM) (THANE METRO), यांचा तुलनात्मक अभ्यास केला असता त्यामध्ये विविध त्रुटी असणे, उत्तरेला घोडबंदर रस्त्याच्या दुतर्फा वाढलेल्या शहराला जोडण्याकरिता MRTS चा विस्तार कावेसर पर्यंत वाढविला असणे, ठाणे पूर्वेचा भाग संपूर्णपणे MRTS च्या आखणीतून वगळण्यात आला असणे, सिडको बस स्टॉप ते पूर्व द्रुतगतीमहामार्ग यादरम्यान, MRTS ची आखणी नव्याने करण्यात आली असून, MRTS चा हा भाग संपूर्णतः भूमिगत असणार असणे, या ठळक मुद्द्यांपैकी उत्तरेला घोडबंदर रस्त्याच्या दुतर्फा वाढलेल्या शहराला जोडण्याकरिता MRTS चा केलेला विस्तार हा नक्कीच स्वागतार्ह असणे, मात्र नव्याने विकसित होणाऱ्या भागांना जोडणारी मार्गिका तयार करत असताना ठाणे पूर्व सारख्या अत्यंत जुन्या भागाला या मार्गिकेतून वगळणे, सिडको बस स्टॉप ते पूर्व द्रुतगती महामार्ग दरम्यान MRTS च्या नव्याने केलेल्या आखणीनुसार सदर मार्गिका, ठाणे पश्चिमेकडील स्टेशन लगतच्या अत्यंत दाट लोकवस्ती असलेल्या भागातील सुमारे ५० इमारतींना बाधित करत भूमिगत पद्धतीने प्रस्तावित असणे, सर्वांगीण विचार करता सदर प्रस्तावित भूमिगत मार्गिका अत्यंत अव्यवहार्य असणे, भूमिगत मेट्रोचा खर्च हा उन्नत मेट्रोच्या खर्चाच्या सुमारे चार पट जास्त असतो व त्यामुळे वाढीव खर्चाचा बोजा सदर प्रकल्पावर येत असणे, त्याचबरोबर सदर प्रस्तावित भूमिगत मार्गाचा अभ्यास केला असता असे निदर्शनास येते की, सदर मार्ग अस्तित्वातील रस्त्याच्या खालून न जाता, अस्तित्वातील सुमारे चाळीस वर्ष जुन्या, जवळपास ५० इमारतींच्या खालून जात असणे, या बाधित, जुन्या आणि मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास, हा देखील या भूमिगत मेट्रोच्या प्रस्तावित मार्गीकेमुळे अडचणीत आला असणे, भूमिगत मेट्रो मार्गामुळे निर्माण होणाऱ्या प्रश्नांवर सखोल अभ्यास करण्यासाठी व त्यातून मार्ग

अप्रकाशित प्रत

काढण्यासाठी लोकप्रतिनिधींना सोबत घेऊन समिती तयार करणे आवश्यक असणे, तसेच मेट्रोचे काम कुठल्याही परिस्थितीत थांबू न देण्यासाठी लवकरात लवकर उपरोक्त प्रश्नांवर तोडगा काढून नागरिकांना देखील दिलासा देण्याची आवशक्यता, यावर शासनाने करवयाची कार्यवाही."

**(६)** **सर्वश्री सुनिल शिंदे,** विलास पोतनीस, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडून सन २०२१-२२ या वर्षात केवळ २४ टक्के विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली असून तब्बल ७६ टक्के विद्यार्थी अद्यापही आरोग्य तपासणीपासून वंचित राहिले असल्याची बाब प्रजा फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थेने दि. ५ डिसेंबर, २०२२ रोजी प्रसिद्ध केलेल्या अहवालावरून समोर आली असणे, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडून होणारी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी हा विभागाचा सर्वोत्तम उपक्रमांपैकी एक असणे, तरीदेखील बृहन्मुंबई महानगरपालिका शाळेत शिक्षण घेत असलेल्या तीन लाख अठरा हजार दोन विद्यार्थ्यांपैकी केवळ ८४ हजार २४७ विद्यार्थ्यांची आजतागायत आरोग्य तपासणी करण्यात आलेली असणे, तसेच सन २०१४ - २०१५ ते सन २०२१-२०२२ दरम्यान शिक्षण विभागाकडून होणाऱ्या आरोग्य तपासणी उपक्रमात ५८ टक्क्यांची घट दिसून आली असणे, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडे आरोग्य तपासणीसाठी आवश्यक असलेल्या निधीची तरतूद असतानाही विद्यार्थ्यांच्या आरोग्याची होत असलेली हेळसांड, कोविड काळानंतर आणि मुंबईत पसरलेल्या विविध साथ रोगांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने असलेली आरोग्य तपासणीची असलेली नितांत आवश्यकता, परंतु शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थी आणि पालकांत शासनाप्रती पसरलेली तीव्र नाराजीची आणि संतापाची भावना, यास्तव बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांची नियमित आरोग्य तपासणी करण्याबाबत शासनाने तत्काळ करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

**(७)** **श्री. महादेव जानकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"शासनाने सहायक प्राध्यापक पदभरती संदर्भात दिनांक १२ नोव्हेंबर, २०२१ व एप्रिल, २०२२ च्या शासन निर्णयानुसार २०८८ पदांच्या भरतीला त्वरित परवानगी देण्याबाबत व २०२२ पर्यतची सर्व रिक्त पदे १०० टक्के भरण्यात यावी, तसेच तासिक तत्वावरील मानधन वाढीसंदर्भात, व दिनांक १ ऑक्टोबर, २०१७ च्या आकृतीबंधाला अंतिम मान्यता देऊन १०० टक्के

प्राध्यापक पदभरती करण्याबाबतच्या प्रमुख मागण्या अद्यापी प्रलंबित असल्याचे नुकतेच माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये उघडकीस येणे, राज्यात गेल्या १० वर्षामध्ये प्राध्यापक पदभरती नियमित व पुर्ण क्षमतेने झालेली नसल्याचे उघडकीस येणे, ७५ टक्के भरतीला परवानगी असतानाही नियमित भरती केलेली नसणे, सन २०१४ पासून आजपर्यत प्राध्यापक पदभरती सातत्याने कपात करण्यात येणे, सन २०१७ पासून महाराष्ट्र नवप्राध्यापक संघटनेने महाराष्ट्रातील उच्चशिक्षित तरुण NET, SET, PHD पात्रता धारकांना न्याय मिळावा, विदयार्थ्यांना गुणवत्तापुर्ण शिक्षण मिळावे याकरिता रस्त्यावर उतरुन आंदोलने केलेली असणे, आतापर्यत केवळ २ ते ३ हजार प्राध्यापकांची भरती शासनाने केलेली असणे, अद्याप हजारो जागा रिक्त असणे, दिनांक २५ मे, २०१७ ला आकृतीबंधाच्या नावाखाली प्राध्यापक पदभरतीवर बंदी घालण्यात येणे, उच्च शिक्षणातील अशासकीय, शासकीय, अकृषी विद्यापीठातील आकृतीबंध मंजुरीसाठी भरती बंद केली त्यानंतर दिनांक १ ऑक्टोबर, २०१७ चा आकृतीबंधानुसार दिनांक ३ नोव्हेंबर, २०१८ साली दिनांक १ ऑक्टोंबर, २०१७ च्या आकृतीबंधाला उच्च स्तरीय सचिव समितीने तत्वता मान्यता देण्यात येणे, त्यानुसार अध्यापक संवर्गातील (सहायक प्राध्यापक) एकूण रिक्त पदांच्या ४० टक्केनुसार ३५८० पदांच्या भरतीला मान्यता देण्यात येणे, व या पदांची भरती सुरु होती परंतु कोव्हिड-१९ च्या पार्श्वभूमीवर दिनांक ४ एप्रिल, २०२० रोजी या भरतीला देण्यात आलेली स्थगिती, परंतु कोव्हिड-१९ संपल्यानंतरही भरती सुरु होत नसल्याने दिनांक १९ एप्रिल, ते १६ सप्टेंबर, २०२१ दरम्यान नवप्राध्यापक संघटनेच्या वतीने शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे यांच्या कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणे, सदर आंदोलनादरम्यान तत्कालिन उच्च शिक्षणमंत्री यांनी दोन महिन्यांत प्राध्यापक पदभरती सुरु करण्याचे दिलेले आश्वासन, कोव्हिड-१९ मध्ये बंद पडलेली भरती सुरु करण्यांसदर्भात दिनांक ३ नोव्हेंबर, २०१८ ला २०८८ उर्वरित पदांच्या भरतीला परवानगी देऊन शासन निर्णय पारित करण्यात येऊन पाच वर्षाहून अधिक कालावधी उलटूनही अद्याप पदे भरण्यात आलेली नसणे, त्यामुळे विद्यार्थ्यांचे होत असलेले शैक्षणिक नुसार, प्राध्यापकांच्या प्रमुख मागण्यांसदर्भात महाराष्ट्र नव प्राध्यापक संघटनेने अनेक आंदोलन व उपोषणे, करुनही याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनाने सहा.प्राध्यापक पदभरती संदर्भात दिनांक १२ नोव्हेंबर, २०२१ व एप्रिल, २०२२ च्या शासन निर्णयानुसार २०८८ पदांच्या भरतीच्या त्वरित देण्याबाबत व २०२२ पर्यतची सर्व रिक्त पदे १०० टक्के भरण्यात यावी, तसेच तासिक तत्वावर मानधन वाढीसंदर्भात, व १ ऑक्टोबर, २०१७ च्या आकृतीबंधाला अंतिम मान्यता देऊन १०० टक्के प्राध्यापक पदभरती करण्याबाबत सत्वर निर्णय घेऊन प्राध्यापकांच्या प्रमुख मागण्या मान्य करण्याबाबत कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रीया व भूमिका."

**पाच : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास).**

## - मध्यंतर -

**सहा : शासकीय विधेयके —**

**(क) विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

(१) "सन २०२२ चे वि.प.वि. क्रमांक ५ — पिंपरी चिंचवड विद्यापीठ, पुणे विधेयक, २०२२"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ५ - पिंपरी चिंचवड विद्यापीठ, पुणे विधेयक, २०२२" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(२) "सन २०२२ चे वि.प.वि. क्रमांक ६ - युनिव्हर्सल ए आय विद्यापीठ, कर्जत विधेयक, २०२२"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ६ - युनिव्हर्सल ए आय विद्यापीठ, कर्जत विधेयक, २०२२" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(ख) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

**(१)** "सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० — यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय (विद्यापीठ) आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२२"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० – यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय (विद्यापीठ) आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२२" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(२)** "सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ – महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२२"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ – महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२२" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(३)** "सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ – महाराष्ट्र पोलीस आणि महाराष्ट्र सिनेमा (विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२२"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ – महाराष्ट्र पोलीस आणि महाराष्ट्र सिनेमा (विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२२" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(४)** "सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ – महाराष्ट्र कामगार कायदे (सुधारणा) विधेयक, २०२२"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ – महाराष्ट्र कामगार कायदे (सुधारणा) विधेयक, २०२२." विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा

अमुद्रित प्रत

महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(५)** "सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ – उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकासकामे नियमाधीन करणे (सुधारणा) विधेयक, २०२२"

---

**सात : उद्योग मंत्री यांचा म.वि.प. नियम १०६ अन्वये शासकीय ठराव :-**

**ज्याअर्थी,** नागरी विमानचालन महासंचालक, नागरी विमानचालन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी, स्थायी आदेश क्रमांक ७२७(ई), दिनांक ४ ऑक्टोबर १९९४ व्दारे प्रदान केलेल्या, वायुयान अधिनियम, १९३४ (१९३४ चा २२) या अन्वये तयार केलेल्या वायुयान नियम, १९३७ याच्या नियम ७८ खालील अधिकारांचा वापर करुन, सिंधुदुर्ग विमानतळ, सिंधुदुर्ग याकरिता, आयआरबी सिंधुदुर्ग एअरपोर्ट प्रायव्हेट लिमिटेड यास 'विमानतळ लायसन - सार्वजनिक हितार्थ वापरार्थ' दिले आहे;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग येथील उक्त विमानतळाला "बॅ. नाथ पै. विमानतळ, सिंधुदुर्ग" असे नाव देणे इष्ट आहे आणि त्या प्रयोजनार्थ, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांची मान्यता मिळाल्यानंतर, असा प्रस्ताव, भारत सरकारच्या नागरी विमानचालन मंत्रालयाकडे पाठवणे आवश्यक आहे;

**त्याअर्थी आता,** महाराष्ट्र विधानपरिषद नियमांच्या नियम १०६ नुसार, महाराष्ट्र विधानपरिषद याव्दारे, सिंधुदुर्ग येथील उक्त विमानतळाला "बॅ. नाथ पै. विमानतळ, सिंधुदुर्ग" असे नाव देण्याची शिफारस भारत सरकारला करते.

अमुद्रित प्रत

आठ : (क) **(मंगळवार, दिनांक २० डिसेंबर, २०२२, बुधवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२२ व गुरुवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) –**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** चंद्रशेखर बावनकुळे, प्रसाद लाड, सुरेश धस, गोपिचंद पडळकर, रमेशदादा पाटील, रामदास आंबटकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, निलय नाईक, प्रा. राम शिंदे, डॉ. रणजित पाटील, सर्वश्री रामराव पाटील,

अमरीश पटेल, श्रीकांत भारतीय, प्रविण पोटे-पाटील, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री प्रविण दटके, रमेश कराड, वसंत खंडेलवाल, श्रीमती उमा खापरे, श्री. राजहंस सिंह, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव — (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)** —

"महाविकास आघाडी सरकारच्या ३३ महिन्यांच्या कार्यकाळात विदर्भ, मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागातील अनेक विकास प्रकल्पांकडे अक्षम्य दुर्लक्ष करण्यात येणे, राज्यात विदर्भ, मराठवाडा व कोकणासह उर्वरित अविकसित भागाचा संतुलित विकास होण्याची आवश्यकता, नैसर्गिक व सेंद्रिय शेती आणि फळबागांच्या लागवडीस प्रोत्साहन देणे, संत्रा उद्योग, दुग्धव्यवसाय, कुकुटपालन, मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन इत्यादी शेतीच्या जोडधंद्यांना प्रोत्साहन देऊन अधिकाधिक रोजगार उपलब्ध करणे, कृषीमालावर आधारीत प्रक्रिया उद्योग उभारणे, धानावर प्रक्रिया उद्योग उभारणे, विदर्भ आणि मराठवाड्यातील तिर्थक्षेत्र व पर्यटनस्थळांचे जाळे तयार करून रोजगार निर्मिती वाढविणे, विदर्भातील कापूस उत्पादनावर आधारीत सूत गिरण्या व कापूस उद्योगाला चालना देणे, विदर्भ व मराठवाड्यात खनिज व जंगल संपत्ती मोठ्या प्रमाणात असल्याने त्याचा अधिकाधिक फायदा जनतेला मिळण्याच्या दृष्टीने आधुनिक तंत्रज्ञान विकसित करणे, विदर्भातील विशेषत: अमरावती व मेळघाट येथे आधुनिक सोयीसुविधा युक्त रुग्णालयांची निर्मिती करून कुपोषणामुळे होणारे बालकांचे मृत्यू टाळण्याची आवश्यकता, राष्ट्रीयकृत बँकांच्या तुलनेत सहकारी बँकांची जिल्ह्या-जिल्ह्यात सहज उपलब्ध होणारी सेवा विचारात घेता सहकारी बँकांवरचे वाढते निर्बंध शिथील करण्याची आवश्यकता, राज्यातील गड-किल्ल्यांचे जतन करून त्यांच्या संवर्धनाकरीता विशेष निधी उपलब्ध करणे व राजे शिवछत्रपतींचा इतिहास पर्यटकांसमोर मांडण्याची आवश्यकता, राज्यातील १२ बलुतेदारांसाठी एमआयडीसीमध्ये कौशल्य विकास केंद्राचे जाळे उभारून ग्रामीण भागातील बलुतेदारांना त्यांच्या व्यवसायांत आयटीआयच्या धर्तीवर तंत्रशिक्षण देऊन त्यांच्या उद्योगात आधुनिकता आणण्याची आवश्यकता, केंद्र शासनाचे नदीजोड प्रकल्प प्रभावीपणे कार्यान्वित करण्याची आवश्यकता, विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांना बारमाही पाणी उपलब्ध करून त्यांच्या उत्पादनास चालना देण्याची आवश्यकता, जलयुक्त शिवार योजनेमुळे शाश्वत सिंचनाच्या सुविधा अधिक प्रभावी करण्याकरीता या योजनेच्या अटी व निकष शिथील करणे, विदर्भ व मराठवाड्यासह राज्यातील बेरोजगार युवकांची वाढती संख्या विचारात घेता

अशुध्दित प्रत

मिहान प्रकल्प व अन्यत्र जड उद्योग, कृषी प्रक्रिया उद्योग, ऑटोमोबाईल प्रकल्प सुरू करण्याची आवश्यकता, राज्यातील सर्व जिल्ह्यांत पर्यावरणाचा धोका टाळण्यासाठी अधिकाधिक वृक्षलागवड करण्याची आवश्यकता, सन २०२२-२३ हे मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अमृतमहोत्सवी वर्ष म्हणून राज्य शासनाच्या वतीने साजरे करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही."

(ख) **(गुरुवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री अंबादास दानवे**, एकनाथराव खडसे, अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.अनिल परब, सर्वश्री विक्रम काळे, सतेज उर्फ बंटी पाटील, नरेंद्र दराडे, सतीश चव्हाण, डॉ. सुधीर तांबे, सर्वश्री विलास पोतनीस, अब्दुलाखान दुर्राणी, अभिजीत वंजारी, डॉ. मनिषा कायंदे, सर्वश्री अनिकेत तटकरे, राजेश राठोड, सुनिल शिंदे, अमोल मिटकरी, वजाहत मिर्झा, जयंत आसगावकर, सचिन अहिर, अरुण लाड, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री आमश्या पाडवी, विप्लव बाजोरीया, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्यात विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रातील अविकसित भागाचा झपाट्याने विकास होण्याच्या दृष्टीने योजनांच्या अंमलबजावणीत सातत्य दाखविण्याची नितांत आवश्यकता असणे, दरवर्षी नागपूर अधिवेशनात विदर्भ व मराठवाड्याच्या कृषि, सिंचन, शिक्षण इत्यादी अनुशेषाबाबत चर्चा होणे, तथापि, अनुशेष दूर करण्यासाठी ठोस कार्यवाही न होणे, विदर्भातील मुख्य फळपीक असलेल्या संत्रा पिकासाठी अमरावती जिल्ह्यातील वरुड-मोर्शी तालुक्यात अत्याधुनिक संत्रे प्रक्रिया प्रकल्प स्थापन करण्याच्या निर्णयाची, मराठवाडा व आसपासच्या भागातील मोसंबी पिकाची गुणवत्ता व उत्पादकता वाढविण्याकरिता "सायट्रस इस्टेट" स्थापन करण्याच्या निर्णयाची, औरंगाबाद जिल्ह्यातील चिखलठाणा येथे अंडीपुंज निर्मिती केंद्र निर्माण करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याकडे शासनाने विशेष लक्ष देण्याची गरज असणे, विदर्भ व मराठवाड्यातील कापूस व सोयाबीन मूल्य साखळी विकासासाठी विशेष कृती योजनेची धडक अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, माहे जून ते ऑक्टोबर, २०२२ या काळात अतिवृष्टी, पूर, सततचा पाऊस व अवकाळी पाऊस यामुळे राज्यातील कापूस, सोयाबीन, तूर, मूग या पिकांचे तसेच संत्री, मोसंबी, डाळींब, द्राक्ष या फळपिकांचे नुकसान झाले असणे, ओला दुष्काळ जाहीर करण्याच्या केलेल्या मागणीकडे सरकारने

अग्रिम प्रत

दुर्लक्ष केलेले असणे, त्याऐवजी तुटपुंजी मदत जाहीर करून अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना जाहीर केलेली मदतही अद्याप मिळालेली नसणे, सरकारच्या उदासीनतेमुळे पीक विमा कंपन्यांनी शेतकऱ्यांचे लाखो दावे नाकारुन केलेली फसवणूक, विदर्भात कापसावर लाला रोगाचा व संत्र्यावर कोळश्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे प्रचंड नुकसान झाले असणे, राज्य व केंद्र सरकारच्या चुकीच्या कृषी धोरणांमुळे व मदतीचा हात आखडता घेतल्याने माहे जुलै, २०२२ पासून ६ महिन्यांच्या काळात सुमारे दीड हजार शेतकऱ्यांनी जीवनयात्रा संपवली असणे, "शेतकरी आत्महत्यामुक्त महाराष्ट्र" ही सरकारची घोषणा हवेत विरली असणे, शेतकऱ्यांच्या आत्महत्या सन २०१५ ते २०२० या कालावधीसाठी एनडीआरएफचे निकष निश्चित केले असताना व सन २०२१ मध्ये निकषात वाढ अपेक्षित असताना २ वर्षांचा काळ उलटून गेल्यानंतरही केंद्र सरकारने निकषात वाढ केली नसणे, परिणामी शेतकऱ्यांना एनडीआरएफ व एसडीआरएफमधून तुटपुंजी मदत मिळत असणे, धान खरेदी केंद्र सुरु करण्यास झालेला अक्षम्य विलंब, धान खरेदीत झालेले घोटाळे, यामुळे अनेक शेतकऱ्यांचा धान विक्रीअभावी पडून असणे, गडचिरोली जिल्ह्यातील सुरजागड प्रकल्पामुळे आपल्या राज्यातील खनिज प्रक्रिया करण्यासाठी अन्य राज्यात जात असणे, मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करण्यासंदर्भात सरकारकडून बेफिकीरी व अनास्था दिसून आलेली असणे, मागील सरकारने केलेल्या कार्यक्रमाचे नियोजन व निधीची तरतूद याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करुन कार्यक्रम अंमलबजावणीत उदासीनता दाखवली असणे, मुक्तीसंग्राम दिनी महाराष्ट्र शासनामार्फत कोणताही भव्यदिव्य कार्यक्रमाचे आयोजन न केल्यामुळे महाराष्ट्रातील जनतेत तीव्र संतापाची लाट पसरली असणे, मुक्तीसंग्रामातील स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रलंबित प्रश्नांचा तातडीने निपटारा करण्याची आवश्यकता, एम.आय.डी.सी. अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्यामुळे संबधित अधिकारी मॅट मध्ये जावून उक्त बदल्या रद्द केल्याने यामध्ये शासनास आलेले अपयश, राज्याच्या इतर भागात होणाऱ्या ९२ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीच्या व जमीन वाटपाच्या आदेशाला विद्यमान सरकारने स्थगिती दिल्यामुळे राज्यात येणारे प्रकल्प रखडले असणे, महाराष्ट्राचे उद्योग परराज्यात जाणे हे सरकारवर उद्योग जगताचा विश्वास नसल्याचे स्पष्ट होणे, शासनाच्या उदासिनतमुळे वेदान्त फॉक्सकॉन, टाटा एअर बस, बल्क ड्रग पार्क अश्याप्रकारे बरेच प्रकल्प राज्याबाहेर जाणे, यातून एम.आय.डी.सी च्या उच्चाधिकार समितीची निष्क्रियता दिसून येणे, उद्योग मंत्र्यांनी शासनाचे अपयश लपविण्यासाठी राज्याबाहेर जाणाऱ्या उद्योगाबाबत मागील शासनावर जबाबदारी निश्चित करणे, मिहान प्रकल्पात ५५ गुंतवणुकदारांबरोबर करार झाला असताना फक्त ११ कंपन्या कार्यरत झाल्या असणे व फक्त ५९२५ रोजगार निर्मिती झाली असणे, मिहान प्रकल्पासारख्या महत्वाकांक्षी प्रकल्पाकडे सरकारचे होत असलेले दुर्लक्ष, विदर्भातील बुटीबोरी, मिहान सारख्या

अग्रिम प्रत

औद्योगिक वसाहतींमध्ये उद्योगांची पिछेहाट झालेली असणे, विदर्भ, मराठवाड्यात उद्योग व गुंतवणूक आणण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज, विदर्भ, मराठवाडा, व उर्वरित महाराष्ट्रातील आकांक्षित जिल्ह्यासाठी जलसिंचन सुविधा पुनरुज्जीवीत करण्यासाठी अर्थसंकल्पात प्रस्तावित केलेला नियतव्यय प्राधान्याने वितरित करण्याची आवश्यकता असणे, वैनगंगा-पैनगंगा प्रकल्पाचा आराखडा मागील सरकारने पूर्ण करुनही या सरकारने सहा महिन्यात काहीही प्रगती न करणे, बळीराजा योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना इत्यादी जलसंपदा विभागाच्या विदर्भातील योजना गेल्या सहा महिन्यात ठप्प होणे, विदर्भातील सिंचनाच्या सर्व प्रशासकीय बाबी या सहा महिन्यात प्रलंबित राहिल्या असणे, राज्यातील ओबीसी, मागासवर्गीय आणि अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या वसतीगृह व शिष्यवृत्तीचा प्रश्न निर्माण झालेला असणे, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रातील अतिदुर्गम भागात विशेषत: विदर्भातील अमरावती, गडचिरोली, चंद्रपूर इत्यादी जिल्ह्यात बालमृत्यू व कुपोषणाचे प्रमाण सर्वाधिक असणे, राज्यात महिला व अल्पवयीन मुलीवरील अत्याचारात दिवसेंदिवस होत असलेली वाढ, गत नऊ महिन्याच्या कालावधीत महिलांवरील अत्याचारामध्ये २३५ टक्के तर विनयभंगाच्या घटनांमध्ये १७२ टक्क्यांनी वाढ झाल्याचे समोर येणे, दिवसेंदिवस गुन्ह्यांमध्ये वाढ होत असतांनाही याबाबत शासन गंभीर नसणे, परिणामी गुन्ह्यांमध्ये होत असलेली वाढ, तसेच गुन्हे निकाली काढण्यास होत असलेला विलंब, वाढत्या गुन्हेगारीस आळा बसण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर तातडीने करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

## — अशासकीय कामकाज —
## (बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

**नऊ : (क) अशासकीय विधेयके :-**

**पुर:स्थापनार्थ —**

**(१)** "सन २०२२ चे वि.प.वि. क्रमांक ७ — महाराष्ट्र राज्यात लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती, जाहिरात-फलक लावण्यास, समाज माध्यमांवर व संकेतस्थळांवर प्रसिद्ध करण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, २०२२" — श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचे.

**(२)** "सन २०२२ चे वि.प.वि. क्रमांक ८ — महाराष्ट्र अल्पभूधारक शेतकरी यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत विधेयक, २०२२" — श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचे.

अप्रसिद्ध

**(३)** "सन २०२२ चे वि.प.वि. क्रमांक ९ – महाराष्ट्र राज्यातील बेरोजगार युवक-युवतींना बेरोजगारी भत्ता विधेयक, २०२२" – श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचे.

**(ख) अशासकीय ठराव :-**

**(मंगळवार, दिनांक २० डिसेंबर, २०२२ रोजीच्या बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार खालील ठराव दाखविण्यात आले आहेत) –**

**(१) श्री. सुरेश धस, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ७२ -**

"राज्यातील अनुसूचित जमातीच्या जात पडताळणी समित्यांनी दिलेल्या निर्णयाला फक्त उच्च न्यायालयातच अपिल करता येत असल्याने अनेक प्रकरणे निर्णय देताना हेतुपुरस्पर, पुर्वग्रह दूषितपणे जाणीवपूर्वक विरोधात दिले गेल्याचे मा.उच्च न्यायालयात व मा.सर्वोच्च न्यायालयात वारंवार सिध्द होत असून अनेक प्रकरणी जात पडताळणी समित्यांना लाखांवर दंड, समज व निर्णय समितीच बरखास्त केल्याचे मा.उच्च न्यायालयाने/ मा.सर्वोच्च न्यायालयाचे शास्ती म्हणून आहे. अर्थपूर्ण तडजोडीमुळे तसेच राजकीय दबावाखाली येवून येथील निर्णय मोठ्या प्रमाणात बदलत असल्याचे निदर्शनास येत असल्याने संपूर्ण आदिवासी समाजात जात पडताळणी समितीचे कामकाज पक्षपातीपणे होत असल्याचा जनक्षोभ मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेला आहे. खरा लाभार्थी वैधता प्रमाणपत्रापासून वंचित राहू नये म्हणून राज्य शासनाने राज्यातील अनुसूचित जमातीच्या जातपडताळणी समित्यांवर न्यायाधिशांची नेमणूक करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.'"

**(२) श्री. नागोराव गाणार, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ६७ -**

"राज्यात मान्यता प्राप्त अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सेवा महाराष्ट्र खासगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या) शर्ती, नियमावली, १९८१ मधील तरतुदींच्या अधीन आहे. या नियमावलीतील नियम क्रमांक १९ नूसार सेवा निवृत्ती वेतन (जुनी पेन्शन) व नियम २०(२) नुसार भविष्य निर्वाह निधी योजना शिक्षक व कर्मचाऱ्यांना देय असणे, परंतु दिनांक २९ नोव्हेंबर, २०१० च्या निर्णयान्वये लागू केली असणे, तसेच १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी अंशतः

अनुदानित शाळेत नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर यांना ही योजना लागू करणे, सदरहू योजनेतून नियत वयोमानापुर्वी बाहेर पडण्याची तरतुद असणे, तथापि अशाप्रकरणी कर्मचा-यांच्या खाती जमा झालेल्या एकूण रक्कमेच्या ४० टक्के रक्कम वार्षिक (अँन्युईटी) खरेदी करण्यासाठी गुंतविणे अनिवार्य असल्याने राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांमध्ये प्रचंड असंतोष असणे, कर्मचा-यांचा एकूण कल पाहता राज्यातील १०० टक्के अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना लागू असलेली अंशदान निवृती वेतन योजना रद्द करुन त्याऐवजी महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन नियम १९८२ अन्वये लागू असलेली पूर्वीची निवृत्ती वेतन योजना दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर सेवेत नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना लागू करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(३) श्री. रामदास आंबटकर, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ९ -**

"राज्यात विशेषत: विदर्भातील अपूर्ण प्रकल्पांची स्थिती, विदर्भात प्रामुख्याने छोटे-मोठे प्रकल्प गेल्या २० वर्षापासून मंजूर असूनही अद्याप बऱ्याच प्रकल्पांची कामे पूर्ण झालेली नाहीत, अपुऱ्या अनुशेषा अभावी भुसंपादन व पर्यावरण विषयक बाबींमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या, अनेक सिंचन प्रकल्प प्रलंबित आहेत, विदर्भात प्रकल्पांची प्रलंबित कामे पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

अस्पृहित प्रत

| | |
|---|---|
| **विधान भवन,** | **राजेन्द्र भागवत** |
| नागपूर | प्रधान सचिव, |
| दिनांक : २२ डिसेंबर, २०२२ | महाराष्ट्र विधानपरिषद. |